# प्रेस नोट दि. २२/०८/२०१८

हडपसर येथे राहणाऱ्या युवतीने नोकरीसाठी नोकरी डॉट कॉम या वेबसाईटवर स्वत:चा बायोडेटा भर रजिस्ट्रेशन केले असता सदर युवतीस मो. नं. ८५१२८५२९२१, ८५१२८५३१७९, ७०५३७२०३६५, ८५१०९८९५६० यावर Gyc-2service या प्लेसमेंट मधुन बोलत असल्याचे फोन आले व त्यांनी सदर युवतीस चांगल्या पगाराची नोक असल्याचा विश्वास देवुन सदर युवतीस बँक ऑफ महाराष्ट्रचे एक अकाऊंट नंबर देवुन त्या अकाऊंटवर नोकरीसा रजिस्ट्रेशन फी, जॉईनिंग लेटर, यासाठी रु. २१००/-, व ७,२००/- इन्सुरन्स फी – १५,०००/-, ट्रेनिंग फी -२०,०००/-, पेटीएम नंबर ८५०६९४६४१७ यावर सॅलरी डिपॉझिट म्हणुन १०,०००/- रुपये अशी वेळोवळी वेगवेगळी कारणे सांगु एकुण ५४,३००/- रुपये भरण्यास भाग पाडले, सदर रक्कम युवतीने भरल्याबाबत ईमेल आयडी Gyc 2service.outlook.com यावरुन कन्फर्मेशनचे रिप्लाय सदर युवतीचे ईमेल आयडीवर येत होते. सदर युवती वरील प्रमाणे ५४,३००/- रुपये रक्कम भरल्यानंतरही त्यांनी सदर युवतीस नोकरीचे कोणतेही जॉईनिंग लेटर अग नोकरी न दिल्याने सदर युवतीने सदर मोबाईल नंबरवर संपर्क करण्याचा प्रयत्न केला असता त्यांनी त्यांचे वरी मोबाईल नंबर बंद केले तेव्हा सदर युवतीस वर नमुद मोबाईल नंबरवरील इसमांनी नोकरी देण्याचे बहाण्याने वरी प्रमाणे आर्थिक फसवणुक केली असल्याचे लक्षात आल्याने तिने सदरबाबत हडपसर पोलीस स्टेशन येथे तक्रार दिल्या हडपसर पो.स्टे गु.रजि.नं. ९४७/१८ भा.द.वि. ४२०,४१९ सह माहिती तंत्रज्ञान अधिनियम २००८ चे कलम ६६सी, ६६ड प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

वर नमुद गुन्ह्याचा सायबर सेलकडून समांतर तपास करित असताना, तपासादरम्यान आरोपींचे मोबाईल क्रमांकाचे विश्लेषणावरून व इतर तांत्रिक माहितीचे आधारे यातील आरोपी हे दिल्ली येथील असल्याचे प्रथम दर्शनी निष्पन्न झाल्याने सदर आरोपींचा शोध घेणेकामी सायबर विभागाकडील १ पोनि, १ पोउपनि व पथक दिल्ली येथे रवान झाले. त्यानुसार आरोपींचा दिल्ली येथे जाऊन शोध घेतला असता आरोपी नामे पिंटु कुमार यादव वय २५ वर्षे रा. न अशोकनगर, दिल्ली, ३) सतीश राज यादव वय २२ वर्षे रा. सदर यांना दिल्ली ताब्यात घेवुन येथून अटक करण्यात आली आहे. त्याचेकडून गुन्हा करण्यासाठी वापरत असलेले १४ मोबाईल संच, सिम कार्डस, १ लॅपटॉप व इंटरनेट डिव्हाईस, डेबिट कार्ड, पासबुक व रोख रक्कम ४०,०००/- रुपये जप्त करण्यात आले आहे. पुढील तपास हडपसर पोलीस स्टेशन करित आहेत.

सदरची कामगिरी मा. पोलीस आयुक्त डॉ. के व्यंकटेशम्, मा. पोलीस सह आयुक्त श्री. बोडखे, मा. अपर पोलीस आयुक्त, गुन्हे श्री. देशपांडे, मा. पोलीस उप आयुक्त, आर्थिक व सायबर गुन्हे ज्योतीप्रिया सिंह व मा. सहा पोलीस आयुक्त, आर्थिक व सायबर गुन्हे श्री मोरे यांचे सूचनेनुसार वरिष्ठ पोलीस निरीक्षक राधिका फडके यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक संतोष बर्गे, पोलीस उप निरीक्षक नितीन मस्के व कर्मचारी अजित कु-हे, नितेश शेलार, शिरीष गावडे, संतोष जाधव, अनुप पंडीत, शितल वानखेडे यांचे पथकाने केली आहे.

सर्व नागरिकांना आव्हान करण्यात येते की, ८५१२८५२९२१, ८५१२८५३१७९, ७०५३७२०३६५, ८५१०९८९५६० यावरून संपर्क साधून बँक ऑफ महाराष्ट्र-६०१५१६९९७८९, पेटीएम क्रं. ८५०६९४६४१७ यावर नोकरीसाठी पैसे भरावयास लावुन कोणाची फसवणुक झाली असल्यास त्यांनी तात्काळ हडपसर पोलीस स्टेशन येथे संपर्क करावा. अशा प्रकारे कोणीही नोकरीसाठी पैसे भरण्यास लावत नसुन नागरीकांनी अशा बहाण्यांना बळी पडू नये.